


स्थापना : १९९१

विमुक्त जाती सेवा समिती वसंतनगर संचलित...

Email : haridasrathod1@gmail.com
rathod.haridas@yahoo.com
Mo.09423076156, 08805895428

**ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय**

वसंतनगर (कोटग्याळ) ता.मुखेड जि.नांदेड – ४३१५१७ (महाराष्ट्र)

स्वा.रा.ती.म.वि.नांदेड संलग्न (नॅक पुनर्मुल्यांकन ग्रेड-बी) कॉलेज कोड – ११७

E-mail : graminacscollegevnagar@gmail.com    Web : gmvk.co.in

अध्यक्ष
कर्मवीर किशनराव राठोड

सचिव
गंगाधर राठोड

प्राचार्य
डॉ.हरिदास राठोड
एम.ए.(भूगोल),एम.फील.,पीएच.डी.

जा.क्र. जा.क्र.ग्राम/निमंत्रण/2021-22/

दिनांक : दिनांक:-02/02/2022

प्रति,

मा. प्रा.डॉ. प्रदिपकुमार पांडुरंग माने
(तत्वज्ञान विभाग प्रमुख)
आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे.

विषय :- व्याख्याते म्हणून उपस्थित राहणे बाबत...

महोदय,


वरील विषयी आपणास विनंती करण्यात येते की, "तत्वज्ञान" विभागाच्या वतीने दिनांक 04/02/2022 रोजी घेण्यात येत असलेल्या कार्यक्रमास आपण प्रमुख व्याख्याते / ~~पाहुणे~~ म्हणून महाविद्यालयातील विध्यार्थींना / प्राध्यापकांना मार्गदर्शन करावे,

ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.हरिदास राठोड)
**Principal**
Gramin (Arts, Comm. & Science)
Mahavidyalaya, Vasantnagar (Kotgyal)
Tq. Mukhed. Dist. Nanded.

व्याख्याते म्हणून उपस्थित राहण्याबाबतचे पत्र








व्याख्याते डॉ.प्रदिप माने आपले विचार मांडत असताना आणि इतर श्रोता वर्ग


Dr.Mahendra Honwadjkar (You)
Dr. Mahesh Pentewar
Meeting host
Abhishek Wagh 127
Adesh Adsule
Ajay Rindakwale
ajit shingarputle
Alka Jawalikar
aman bagade
Amol Pawar
Anandrao Bamne
Arun Thorve

Beneficiary Students / Staff


Dr. Mahesh Pent
Meeting host
You
+60
Abhishek Wagh 127
Adesh Adsule
Ajay Rindakwale
ajit shingarputle
Alka Jawalikar
aman bagade
Anandrao Bamne
Arun Thorve
Aruna Bakwad
Balasaheb Mulik
Baliram Rathod
Chanbas Pandharpure
Dayeeta Roy
DR ACHOIE PANDUR...
Dr Bajirao Patil
Dr. Govind Shile
Dr. Nagorao Awade

स्थपना : १९९१

विमुक्त जाती सेवा समिती वसंतनगर संचलित...

Email - haridasrathod1@gmail.com
rathod.haridas@yahoo.com
Mo.09423076156, 08805895428

# ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय

वसंतनगर (कोटग्याळ) ता.मुखेड जि.नांदेड - ४३१५१७ (महाराष्ट्र)
स्वा.रा.ती.म.वि.नांदेड संलग्न (नॅक पुनर्मुल्यांकन ग्रेड-बी) कॉलेज कोड - ११७

E-mail : graminacscollegevnagar@gmail.com
Web : gmvk.co.in

अध्यक्ष
**कर्मवीर किशनराव राठोड**

सचिव
**गंगाधर राठोड**

प्राचार्य
**डॉ.हरिदास राठोड**
एम.ए.(भूगोल),एम.फील.,पीएच.डी.

जा.क्र.

दिनांक :-05/02/2022

प्रति,

**मा . डॉ. प्रदीपकुमार माने**

( तत्वज्ञान विभाग प्रमुख )

आबासाहेब गरवारे महाविद्यालय ,पुणे

**जि.पुणे.**

## -:: आभार पत्र ::-

आपण आपल्या कार्यबाहुल्यातून वेळात वेळ काढून आमच्या महाविद्यालयातील तत्वज्ञान विभागाच्या वतीने शुक्रवार दिनांक 04.02.2022 रोजी घेण्यात आलेल्या एक दिवशीय राज्यस्तरीय वेबिनार विषय " **स्वामी विवेकानंदाचे बहुपेडी व्यक्तिमत्व** " या ऑनलाईन कार्यक्रमास आपण प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित राहून सखोल व ज्ञानवर्धक मार्गदर्शन केल्याबद्दल महाविद्यालय व तत्वज्ञान विभाग आपले अत्यंत आभारी आहे.

धन्यवाद !

आपला विश्वासू

डॉ.हरिदास राठोड
**Principal**
Gramin (Arts, Comm. & Science)
Mahavidyalaya, Vasantnagar (Kotgyal)
Tq. Mukhed. Dist. Nanded

कार्यक्रमात आपण विचार मांडलेत त्या बद्दल आभाराचे पत्र

श्री हजुर अबिचलनगर साहिब येथून गुरुद्वारा मालटेकडीच्या रस्त्यात दरम्यान भाविकांकडून ... मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विवेकानंद हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व- प्रा.डॉ.माने

**मुखेड / प्रतिनिधी**

स्वामी विवेकानंदांची धर्माची पुनर्बांधणी करण्यात महत्त्वाची भूमिका होती. त्याबरोबर त्यांनी अनेक क्षेत्रात योगदान दिले. त्यांना अन्य क्षेत्रात काम करायला वेळ मिळायला हवा होता. ते चाळीशीच्या आतच हे जग सोडून ते गेले. विवेकानंदांकडे आपण धर्मवीर किंवा धर्मयोध्दा म्हणून पाहतो पण ते बहुआयामी व्यक्ती होते असे प्रतिपादन आबासाहेब गरवारे महाविद्यालय पुणे येथील तत्त्वज्ञान विभागप्रमुख प्रा.डॉ. प्रदीपकुमार माने यांनी केले.

ग्रामीण ( कला, वाणिज्य व विज्ञान ) महाविद्यालय, वसंतनगर ता. मुखेड येथे स्वातंत्र्यांच्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधून तत्वज्ञान विभागाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय वेबिनार प्रसंगी 'स्वामी विवेकानंदांचे बहुपेडी व्यक्तिमत्त्व' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

प्रा.डॉ.माने म्हणाले की, विवेकानंदांनी केवळ धार्मिक क्षेत्रातच काम केले असे नाही तर ते बॉक्सर होते. त्यांना फुटबॉल व क्रिकेट खेळांची आवड होती. ते उत्तम वक्ते होते. संस्कृत भाषेची त्यांना उत्तम जाण होती. इतिहास, विज्ञान, तंत्रज्ञान, समाजशास्त्राचाही त्यांचा अभ्यास होता. पंडित नेहरूंनी त्यांना आधुनिक ऋषी म्हटले होते. विज्ञान आणि धर्माची सांगड घालण्याचा तसेच व्यवहार व तत्त्वज्ञानाचा पूल ते होते. महाराष्ट्राशी त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध होता. ते वेदांती होते पण त्यांना वेदांत सर्वसामान्यांच्या सेवेसाठी असावा असे वाटत होते. धर्माला व्यवहाराची जोड देण्याचे काम त्यांनी केले. संगीताचे ते जाणकार होते. संगीताने ही आपणास मुक्ती प्राप्त होऊ शकते असे ते म्हणत. पखवाज वाजवायला त्यांना आवडत असे. केवळ प्रार्थना करणारा हा संन्यासी नव्हता. गुहेत बसून धर्माची चर्चा करणे, त्यांना आवडत नव्हते. तामसी व सात्वीक वृत्ती बरोबरच त्यांनी राजसी वृत्ती ही आपल्याकडे आली पाहिजे असे ते म्हणत असत. गीतेच्या अध्ययना पेक्षा ही तुम्ही फुटबॉल खेळून अधिक देवाच्या जवळ जाऊ शकता असे त्यांना वाटत असे. त्यांनी बल आणि शक्तीची उपासना केली. विज्ञान व तंत्रज्ञानाबद्दल त्यांना आदर होता. आजच्या कोरोना परिस्थितीत त्यांचा प्लेग मेनोफेस्टो दिशादर्शक ठरणार आहे. विवेकानंदांचे बहुपेडी व्यक्तिमत्व होते.

समारोपात प्राचार्य डॉ. हरिदास राठोड म्हणाले की, वक्त्याने विवेकानंदाच्या ज्या बाजू आपणास माहित नव्हत्या, त्या बाजू आपल्यासमोर मांडल्या आहेत. विवेकानंदाचा जन्मदिवस युवक दिन म्हणून साजरा केला जातो. आज कर्करोग निदान दिवस आहे. तेव्हा त्या दृष्टीनेही प्रयत्न केले पाहिजेत. युवकांनी व्यसनाच्या आहारी जाता कामा नये.

प्रास्ताविक प्रा.डॉ. सखाराम गोरे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ. महेंद्र होनवडजकर यांनी करुन दिला. सूत्रसंचलन प्रा.डॉ. रामकृष्ण बदने यांनी तर आभार प्रदर्शन ग्रंथपाल प्रा. डॉ.सुग्रीव क्षीरसागर यांनी मानले. तंत्रसहाय्यक म्हणून प्रा.डॉ. महेश पेंटेवार यांनी काम पाहिले.कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,राज्यभरातून विविध प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

## शिवनाम सप्ताह उत्साहात

## 'माझं घर, हरित घर' उपक्रमाला

नांदेड / प्रतिनिधी

---

जिल्हा

दि. ७ फेब्रुवारी २०२२ पान ६

# विवेकानंद हे बहुपेडी व्यक्तिमत्त्व होते - प्रा.डॉ. प्रदीपकुमार माने

मुखेड, (वार्ताहर) दि. ६ : स्वामी विवेकानंद यांना विज्ञान व तंत्रज्ञानाबद्दल आदर होता. आजच्या कोरोनाच्या परिस्थितीत त्यांचा प्लेग मॅनिफेस्टो दिशादर्शक ठरणार आहे. विवेकानंदांचे बहुपेडी व्यक्तिमत्व होते, असे प्रतिपादन आबासाहेब गरवारे महाविद्यालय पुणे येथील तत्वज्ञान विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रदीपकुमार माने यांनी केले.

ग्रामीण महाविद्यालय वसंतनगर येथे स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधून तत्वज्ञान विभागाने आयोजित केलेल्या एकदिवसीय राज्यस्तरीय वेबिनार प्रसंगी 'स्वामी विवेकानंदांचे बहुपेडी व्यक्तिमत्त्व' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हरिदास राठोड हे होते. प्रा. माने पुढे म्हणाले की, विवेकानंदांची धर्माची पुनर्बांधणी करणे ही महत्त्वाची भूमिका होती. त्याबरोबर त्यांनी अनेक क्षेत्रात योगदान दिले. त्यांना अन्य क्षेत्रात काम करायला जेवढा वेळ मिळायला हवा होता तेवढा वेळ मिळाला नाही. ते चाळीशीच्या आतच हे जग सोडून गेले. विवेकानंदांकडे आपण धर्मवीर किंवा धर्मयोद्धा



म्हणून पाहतो पण त्यांनी एवढे एकच काम केले नाही तर ते बॉक्सर होते. त्यांना फुटबॉल व क्रिकेट या खेळांची आवड होती. ते उत्तम वक्ते होते. संस्कृत भाषेची त्यांना उत्तम जाण होती. इतिहास, विज्ञान, तंत्रज्ञान समाजशास्त्र याचाही त्यांचा अभ्यास होता. पंडित नेहरूंनी त्यांना आधुनिक ऋषी म्हटले होते. विज्ञान आणि धर्माची सांगड घालण्याचा तसेच व्यवहार व तत्त्वज्ञानाचा पूल ते होते. महाराष्ट्र राज्याशी त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध होता. ते वेदांती होते पण त्यांना वेदांत सर्वसामान्यांच्या सेवेसाठी असावा असे वाटत होते. धर्माला व्यवहाराची जोड देण्याचे काम त्यांनी केले. संगीताचे जाणकार होते. केवळ प्रार्थना करणारा हा संन्यासी नव्हता. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. हरिदास राठोड म्हणाले की, वक्त्याने विवेकानंदाच्या अनेक बाजू ज्या आपणास माहिती नव्हत्या त्या आपल्या समोर मांडल्या. विवेकानंदांचा जन्मदिवस युवकदिन म्हणून साजरा केला जातो. आज कर्करोग निदान दिवस आहे तेव्हा त्या दृष्टीनेही प्रयत्न केले पाहिजेत. युवकांनी व्यसनाच्या आहारी जाता कामा नये. विवेकानंदांच्या चेहऱ्यावर तेज होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सखाराम गोरे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. महेंद्र होनवडजकर यांनी करून दिला. सूत्रसंचलन माजी प्राचार्य तथा प्रसिद्धी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रामकृष्ण बदने यांनी केले तर आभार ग्रंथपाल प्रा.डॉ.सुग्रीव क्षीरसागर यांनी मानले. तंत्रसहाय्यक म्हणून प्रा.डॉ. महेश पेंटेवार यांनी काम पाहिले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ...सुंदर शिंदे यांच्या वाटेत शिवसेनेचा अडथळा?

---

वर्तमान पत्रातील कार्यक्रमाच्या बातम्या